साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

❊ परळी वैजनाथ ❊ सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ ❊ पाने-४ ❊ २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# परळीकरांनो निवडणार कोणाला ?

**परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- येत्या दोन डिसेंबरला होणाऱ्या परळी नगर पालिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी एकूण आठ उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी ही निवडणूक महायुतीच्या उमेदवार सौ.पद्मश्री बाजीरावभैय्या धर्माधिकारी आणि काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार सौ. मैमुना बेगम सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांच्यात प्रामुख्याने होत आहे. या दोघीही निवडणुकीच्या रिंगणात प्रथमच उतरलेल्या असल्याने लढत मात्र त्यांच्या पतीराजातच होत आहे. उमेदवारांचे पतीराज हे प्रभावी व मोठा जनाधार असलेले नेते आहेत. त्यामुळे परळीच्या नगराध्यक्षपदासाठी इथले नागरिक कोणाला निवडतील? याकडे सर्वांचे आता लक्ष लागले आहे. सलग दुसऱ्यांदा परळी पालिकेचे अध्यक्षपद महिला उमेदवारांसाठी राखीव झाले आहे. नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार असल्याने या निवडणुकीला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. पालिका निवडणुकीत प्रथमच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (शिंदे गट) व इतर घटक पक्ष महायुतीमुळे एकत्र येऊन निवडणूक लढवत आहेत. पक्ष व नेतृत्वाशी एकनिष्ठ असलेले माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या पत्नी पद्मश्रीताईंना महायुतीकडून उमेदवारी मिळाल्याने या निवडणुकीची चुरस वाढली आहे.**





## सौ.पद्मश्री धर्माधिकारी

श्री धर्माधिकारी यांचे कुटुंब जनसेवा व राजकारणाच वसा सांभाळत आलेले आहे. श्री बाजीरावभैय्या यांच्या आजोबापासून श्री धर्माधिकारी कुटुंब शहराच्या राजकारणात आपले स्थान टिकऊन आहे. परळी पालिकेचे उपाध्यक्षपद, अध्यक्षपद, नगरसेवकपद प्रभावीपणे सांभाळून इथल्या राजकारणात या कुटुंबाने चांगली छाप टाकलेली आहे. महायुतीच्या नेतृत्वाने बाजीरावभैय्या धर्माधिकारी यांच्या पत्नी सौ.पद्मश्रीताईंना नगराध्यक्षपदाची उमेदवारी देऊन महायुतीची बाजू अधिक भक्कम केली आहे. पद्मश्रीताई निवडणुकीच्या मैदानात नवीन असल्या तरी विविध निवडणुका व राजकारण त्यांनी प्रत्यक्ष जवळून पाहिलेले आहे. 'तनिष्का' या महिलांच्या सामाजिक व्यासपीठाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पेललेली आहे. या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम त्यांनी राबवलेले आहेत.

गेल्या २०११ पासून परळी पालिकेत सत्तेवर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने शहराच्या विकासासाठी राबवलेल्या विकास योजना यामुळे शहराचा झालेला चौफेर विकास व यापुढे राबवल्या जाणाऱ्या योजना या शिदोरीवर पद्मश्रीताई ही निवडणूक लढवत आहेत. पती बाजीरावभैय्या धर्माधिकारी यांची भक्कम साथ, युतीतील नेते, कार्यकर्त्यांची मोठी ताकद, श्री धर्माधिकारी यांनी समाजकारण व राजकारणाच्या माध्यमातून जोडलेली माणसे, युतीच्या नेतृत्वाचे आशीर्वाद. या बळावर पद्मश्रीताई परळी पालिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा गड जिंकण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नाला परळीकरांची किती आणि कशी साथ मिळते हे या निवडणुकीत दिसणार आहे.




लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा 'धर्म' पाळत या पक्षाच्या उमेदवारांच्या पाठीशी मोठी ताकद उभी करणाऱ्या व परळी पालिकेच्या निवडणुकीची गेल्या अनेक दिवसांपासून तयारी करणाऱ्या काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई यांना महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या स्थानिक नेतृत्वाने धोका देत वेगळी चूल मांडून इतर पक्षातून आलेल्या नेत्याला पक्षाची उमेदवारी दिली. त्यामुळे आघाडीत बिघाडी झाली आहे. राजकारणातील या धोकेबाजीमुळे बहादूरभाई यांच्याबद्दल सर्वसामान्य मतदारांत सहानुभूती वाढली आहे. परळी शहरातील १७ प्रभागातून एकूण ३५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. सुमारे ७९ हजार ५६९ मतदार या निवडणुकीत नगराध्यक्ष व ३५ नगरसेवकांची निवड करणार आहेत. परळी पालिकेवर झेंडा फडकवण्यासाठी विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते कामाला लागले आहेत. निवडणूक रिंगणात उतरलेले उमेदवार आपल्या प्रचाराला लागले आहेत. निवडणुकीनंतर पुढील पाच वर्षे आपल्या शहराचा कारभार पाहण्यासाठी 'कारभारी' निवडण्याचे मोठे आव्हान परळीकरांपुढे आहे. त्यामुळे योग्य, चांगल्या उमेदवाराला निवडून न दिल्यास पुन्हा पश्चाताप करत बसण्यापेक्षा परळीकरांना या निवडणुकीत आपले मतदान परळी शहराचा सर्वांगीण विकास करणाऱ्या, शहरातील नागरी समस्या सोडवणाऱ्या, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या, परळी पालिकेचा कारभार भ्रष्टाचार मुक्त करून तो पारदर्शक करणाऱ्या, शहरातील रखडलेल्या विकासकामांना गती देणाऱ्या, स्वाभिमानी, प्रामाणिक जनसेवकांच्या पारड्यात आपले मतदान टाकावे लागणार आहे. त्यामुळे हा सुजान परळीकरांच्या परीक्षेचा काळ आहे. भूलथापा, प्रलोभनाला बळी न पडता आपल्या शहराच्या नगराध्यक्षा व प्रभागातील नगरसेवकांची निवड करण्यासाठी सज्ज व्हावे लागणार आहे.





## सौ.मैमुना बेगम

परळीच्या शिक्षण, राजकारण व बांधकाम क्षेत्रातील 'भला' माणूस म्हणून 'ख्याती' असलेल्या सय्यद साहेब गुत्तेदार यांच्या सुनबाई व काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई यांच्या पत्नी म्हणून मैमुना बेगम यांची ओळख आहे. परळीत उर्दू शिक्षणाचा पाया घालणारे काँग्रेस पक्ष व आपल्या नेतृत्वावर कायम निष्ठा ठेऊन कार्य करणाऱ्या माजी नगरसेवक कै.सय्यद साहेब गुत्तेदार यांचा वारसा समर्थपणे त्यांचे पुत्र सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई चालवत आहेत. शिक्षण, राजकारण, समाजकारणात सक्रीय असलेल्या बहादूरभाईंनी परळी पालिकेच्या विकास कामातील भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर मांडून सत्ताधाऱ्यांची झोप उडवली आहे. परळीकरांच्या विविध प्रश्नांसाठी सतत लढणारे नेतृत्व म्हणून बहादूरभाईंनी सर्वसामान्य परळीकरांत मोठा विश्वास निर्माण केला आहे. झालेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे नेतृत्व करत त्यांनी आपली ताकद दाखऊन दिली आहे. परळी पालिकेच्या विडणुकीत आपल्या पत्नी सौ.मैमुना बेगम यांना त्यांनी नगराध्यक्षपदासाठी उभे केले आहे. परळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राबववायच्या विविध विकास योजना, सोडवायच्या नागरी समस्या, परळी पालिकेतील भ्रष्टाचार, ढेपाळलेला कारभार या प्रमुख मुद्यावर बहादूरभाई ही निवडणूक लढवत आहेत. काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे नेतृत्व ते करत आहेत. या नेतृत्वाला व त्यांच्या पत्नीला परळी पालिकेच्या निवडणुकीत यशाची संधी परळीकर देतात का? हे लवकरच दिसणार आहे.

## पत्रकारांचे पैसे बुडवणाऱ्याला जनता साथ देईल का?

परळी पालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत एकुण ८ महिला उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यात एका राजकीय नेत्याने आपल्या पत्नीला नगराध्यक्षपदासाठी उभे केले आहे. परळी शहराचे नगराध्यक्षपद सांभाळताना या नेत्याने शहरातील पत्रकारांना दिलेल्या जाहिरातीचे पैसे दिले नाहीत व हे पैसे मागीतल्यावर पत्रकारांच्या अंगावर हा नेता धाऊन गेला. पैसे तर दिलेच नाहीत. लोकशाहीचा चौथास्तंभ म्हणून ओळख असलेल्या पत्रकारितेला धोका देणाऱ्या या नेत्याला या निवडणूक जनता किती साथ देईल. हेही लवकरच दिसणार आहे. याचा विचार सर्वसामान्य परळीकर निश्चितच करतील.

# ना.पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत सोमवारी परळीत महायुतीच्या जाहीर प्रचाराचा शुभारंभ

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आज (दि.२४) परळीत राष्ट्रवादी काँग्रेस-भाजपा- शिवसेना- रिपाई व मित्रपक्ष महायुतीच्या जाहीर प्रचाराचा शुभारंभ राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व आ धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते होणार आहे. त्याचप्रमाणे यावेळी आयोजित महायुतीच्या संयुक्त कार्यकर्ता मेळाव्याला महायुतीचे नेते मार्गदर्शन करणार आहेत.

नगरपरिषद निवडणुक २०२५ महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व १७ प्रभागातील नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचाराचा जाहीर शुभारंभ आज सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता औद्योगिक वसाहत सभागृह, नाथ रोड, परळी वैजनाथ येथे होणार आहे. यावेळी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, शिवसेना नेते प्रा.टि.पी. मुंडे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक,रिपाई नेते सचिन कागदे यांच्यासह महायुतीचे सर्व नेतेगण,पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महायुतीच्या जाहीर प्रचार शुभारंभ व संयुक्त कार्यकर्ता मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस- भाजपा- शिवसेना- रिपाई व मित्रपक्ष महायुती प्रचार समितीने केले आहे. ***

# काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीसाठी महिलांची ताकद मैदानात!



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ निमित्त काँग्रेस आय व वंचित बहुजन आघाडी यांच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार मैमुना बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादुरभाई यांच्या प्रचारार्थ आज प्रभाग क्रमांक १७ मध्ये महिलांची अभूतपूर्व उत्साहपूर्ण रॅली काढण्यात आली. शेकडो महिलांच्या मोठ्या सहभागामुळे संपूर्ण परिसर घोषणांनी दणाणून गेला. महिलांचा आवाज बहादुरभाईंना साथ! अशा घोषणा देत जनतेने समर्थनाचा दृढनिश्चय व्यक्त केला.

जनतेच्या अपेक्षांना न्याय देत परळीचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार व्यक्त करत, बहादुरभाईंनी महिला सक्षमीकरण, स्वच्छता, आरोग्य सुविधा, मुलींचे शिक्षण व नागरिकांचा मूलभूत हक्क हा आपला प्रमुख अजेंडा असल्याचे सांगितले.नागरिकांकडून मिळत असलेला वाढता प्रतिसाद पाहता परळीत सत्ता परिवर्तनाचे संकेत स्पष्ट होत असून, बदलाची चाहूल मैमुना बेगम नगराध्यक्षा होणार ! असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# प्रभाग क्र.२ मध्ये नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व उमेदवारांच्या प्रचारार्थ रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



परळी वैजनाथ, (बातमीदार):- नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पदमशी बाजीराव धर्माधिकारीव प्रभाग क्रमांक २ मधील अधिकृत उमेदवार सौ. कविता अनंत इंगळे तसेच उमेदवार अल्ताफ पठाण यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली.या रॅलीला भरभरून प्रतिसाद मिळाला.

या रॅलीची सुरुवात मिलिंद नगर येथील बुद्ध विहारात तथागत गौतम बुद्धांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,अनंत इंगळे अल्ताफ पठाण यांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले. या प्रभागात ढोलताशांच्या गजरात प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीत महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते,या भागातील नागरिक मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्त सहभागी झाले होते.

# भारतीय लोक प्रशासन संस्थेतर्फे कै.बी.जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, (विमाका):- भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे आयोजित कै. बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

सन २०२५-२०२६ या वर्षात निबंध स्पर्धेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचे युग, सोशल मीडिया आव्हाने आणि संधी, नागरिकांचे जीवन सुलभ करणे या तीन पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निबंध हा वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर इंग्रजी किंवा मराठीतून सादर करावयाचा आहे. निबंध ३ हजार शब्दांपेक्षा कमी आणि ५ हजार शब्दांपेक्षा जास्त नसावा, निबंध हा विषयाच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक, संशोधनपर व पदव्युत्तर दर्जाचा असणे अपेक्षित आहे. निबंध कागदाच्या एकाच पृष्ठभागावर टंकलिखित करुन त्यावर केवळ टोपणनांव लिहून चार प्रतीत सादर करावा. स्पर्धकाने निबंधावर आपले नाव किंवा कोणत्याही प्रकारची ओळख नमूद करु नये, निबंधाच्या प्रती व त्या सोबत वेगळ्या लिफाफ्यात स्पर्धकाचे नाव (मराठी व इंग्रजीतून); टोपणनाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ता नमूद करुन निबंधासोबत पाठवावे. या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस १० हजार रुपये, दुसरे बक्षिस ७ हजार ५०० रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये उत्तेजनार्थ बक्षिस २ हजार रुपये देण्यात येणार आहेत.

संस्थेस प्राप्त झालेल्या निबंधाच्या प्रती परत करण्यात येणार नाहीत. निबंधाचे मूल्यमापन हे संस्थेच्या प्रादेशिक शाखेच्या परीक्षक मंडळाकडून करण्यात येईल. योग्य त्या गुणवत्तेचा निबंध नसल्यास स्पर्धकास बक्षीस न देण्याचा किंवा बक्षिसाची रक्कम कमी करण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे. बक्षीस देण्याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम राहील. संस्थेच्यावतीने यापूर्वी घेतलेल्या स्पर्धेत विजेता ठरलेला किंवा उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त स्पर्धक हा लगतची तीन वर्षे या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र ठरणार नाही. ***



# तुम्हालाच निवडून देऊ...



नाल्यांत तुंबलेल्या घाणीचा घमघमाट आम्ही सोसू,
डासांच्या टोळधाडींच्या हल्ल्यात शरीरभर चटके आम्हीच खाऊ,
*तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

रस्त्यांवरील खड्ड्यांना आम्हीच चुकवत चालू,
पावसाळ्यात त्याच खड्ड्यांत आमचीच वाहने बुडवू,
*तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

कचरा उचलण्यासाठी गाडी वेळेवर आली नाही तरी आम्हीच थांबू,
दोन-दोन दिवस दुर्गंधीत श्वास रोखून जगू,
*तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

महाराष्ट्रातील सर्वात अस्वच्छ वॉर्ड कोणता याची स्पर्धा लावली तरी
आमचेच वॉर्ड जिंकतील, पण आम्हीच त्यात राहून तुमचेच फोटो पाहून
आत्मसंतोष मानू, *तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

नाल्यामधून येणाऱ्या काळ्या फेसाला आम्हीच तोंड देऊ,
पावसाच्या पाण्यात मिसळलेल्या नाल्याच्या लोंढ्यातूनच घराच्या
दारापर्यंत वाट काढू, *तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

सांडपाणी रस्त्यावर येत असेल तर आम्हीच विटा टाकून मार्ग बनवू,
महापालिकेचा फोन लावूनही प्रतिसाद मिळाला नाही
तरी आम्हीच शांत राहू, *तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

आरोग्याच्या रुग्णालयात बेड मिळाला नाही तर आम्हीच
गावोगावी धावू, डेंग्यू-मलेरियाची लक्षणे दिसली
तरी सरकारी फवारणी कधी येते तेच बघत राहू,
*तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

शहरातील चौका-चौकांतील गटारांच्या झाकणांची चोरी झाली
तरी आम्हीच टाळून चालू, त्यात पडलेला एखादा जनावर
वा माणूस दिसला तरी काय करणार? म्हणूनच पुढे निघू,
*तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

फुटपाथवरच्या अतिक्रमणाने रस्ता अर्धा झाला तरी
आम्हीच कडेकडेने निसटू, वाहतूक कोंडीच्या भोंग्यात
कान जळले तरी आम्हीच हसत घरी पोहोचू,
*तरीही तुम्हालाच निवडून देऊ...!*

सेवक तुम्ही आमचे, सेवक तुम्ही आमचे, पण मुजरा आम्हीच करु,
कारण परळीकरांच्या सहनशक्तीला तरी सीमा आहे का?
नाहीच! मग पुढच्यावेळीही *तुम्हालाच निवडून देऊ...!*

कारण आम्हाला तुमच्या गृहीत धरण्याची खूप चांगली सवय झाली आहे.
आम्हाला त्रास सहन करण्याची भारी हौस आहे.
तुमच्या जय, विजयाच्या पिपाण्या आम्हीच वाजवू.
*तुम्हालाच निवडून देऊ..!*

**- चित्रा देशपांडे, परळी वैजनाथ**

संपादकीय...

# परळीच्या विकासासाठी..!

✲ सुविचार ✲

**मोहात पडणाऱ्या गोष्टींपासून वेळीच दूर होता आलं नाही तर आजचा आनंद उद्याच्या दुःखाचं कारण बनतो!**

या-ना-त्या कारणाने रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आता होत आहेत. नगर पालिका व नगर पंचायतीच्या निवडणुकीची धूम सध्या राज्यात सुरू झाली आहे. सुमारे नऊ वर्षानंतर होत असलेल्या या निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले आहेत. या निवडणुकीचा प्रचार सध्या जोरदार सुरू आहे. येत्या दोन डिसेंबरला या निवडणुकीसाठी मतदान होत आहे.

आपल्या परळी नगर पालिकेसाठी होत असलेल्या या निवडणुकीत एकूण १७ प्रभाग आहेत. त्यातून सुमारे ३५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. गेल्या वेळेप्रमाणे याही निवडणुकीत नगराध्यक्षपदाची निवड थेट जनतेतून होत आहे. परळी शहरातील ७९ हजार ५६९ मतदार आपल्या प्रभागासाठी नगरसेवकाची व शहरासाठी नगराध्यक्षांची निवड करणार आहेत. गेल्या निवडणुकीप्रमाणे यंदाही परळीचे नगराध्यक्षपद महिला उमेदवारासाठी राखीव आहे. नगराध्यक्षासह १७ नगरसेविका मिळून एकूण आठरा महिला यंदा परळी पालिकेच्या सभागृहात जाणार आहेत. पालिका सभागृहात पुरूषांच्या तुलनेत महिला सदस्यांची संख्या एकने अधिक असणार आहे.

भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (शिंदेगट) आदी पक्षाच्या महायुतीने या निवडणुकीत परळीत सर्वच जागेवर आपले उमेदवार उभे केले आहेत. महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहे. काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला सोबत घेऊन या निवडणुकीत आपले उमेदवार उभे केले आहेत. या शिवाय मनसे व इतर पक्षाचेही उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. शिवाय अपक्षांचीही संख्या मोठी आहे. नगराध्यक्षपदासाठी एकूण आठ महिला उभ्या आहेत तर नगरसेवकपदासाठी निवडणूक लढवणाऱ्यांची संख्या सुमारे १७६ आहे. प्रभाग क्रमांक १० मधून तीन नगरसेवक निवडले जाणार आहे. महायुती वगळता इतर पक्षाला या निवडणुकीत सर्वच जागेवर आपले उमेदवार उभे करता आलेले नाहीत.

नगराध्यक्षपद महिला उमेदवारांसाठी राखीव असल्याने विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी या निवडणुकीत आपल्या सौभाग्यवतींना उभे केलेले आहे. लढत मात्र त्यांच्या पतीराजातच होत आहे. परळीच्या राजकारण व समाजकारणात सक्रीय असलेल्या एकही महिला नेत्या, कार्यकर्त्या नगराध्यक्षपदासाठी निवडणूक रिंगणात उभ्या नाहीत. ज्या निवडणूक मैदानात उतरलेल्या आहेत. त्या महिला उमेदवार प्रथमच निवडणूक लढवणाऱ्या आहेत. गेल्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढवणाऱ्या एकही महिला उमेदवार यंदाच्या निवडणुकीत उतरलेल्या नाहीत. नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी निवडणूक रिंगणात उतरलेल्या उमेदवारांची संख्या मोठी आहे. आपल्या परळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, शहरातील नागरी समस्या सोडवण्यासाठी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडणुकीत योग्य उमेदवाराला निवडून देण्याचे मोठे आव्हान परळीकरांपुढे आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणाऱ्या, जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या उमेदवारालाच निवडून देणे गरजेचे आहे. मग तो कोणत्या पक्षाचा, जाती, धर्माचा आहे हे महत्वाचे नाही. 'आपला माणूस, कामाचा माणूस' हे ब्रीद समोर ठेऊन योग्य उमेदवाराला संधी देणे हे आपल्या हाती आहे. नेत्यांच्या भूलथापाला, प्रलोभनाला, खोट्या आश्वासनाला बळी न पडता चांगली शिकलेली माणसं पालिकेत निवडून पाठवा. चांगली माणसं पालिकेत निवडून गेल्यावर ते शहराचा विकास करतील. नागरी समस्या सोडवतील, आपल्या परळी शहराला आदर्श गाव बनवतील, परळी पालिकेत ढेपाळलेला भ्रष्टाचार, निष्क्रीय अधिकारी यांना दूर करून पालिकेचा कारभार पारदर्शक व लोकाभिमुख करतील. तेंव्हा परळीसाठी, परळीच्या विकासासाठी येत्या दोन डिसेंबरला होणाऱ्या मतदानावेळी योग्य उमेदवाराला निवडा हेच आपल्याला कळकळीचे आव्हान...! ✲✲✲

# जनतेला हवा आहे नवा, स्वच्छ आणि निखळ प्रामाणिक चेहरा!

आजच्या राजकारणात एक गोष्ट सातत्याने लक्षात येते की नेते बदलतात, चेहरे बदलतात; पण तळागाळातील कार्यकर्त्यांची किंमत बदलत नाही. कोणत्याही पक्षाची खरी ताकद असते. ती त्याच्याकडे असलेले निष्ठावंत कार्यकर्ते आणि विश्वासार्ह नेतृत्व. या दोन स्तंभांवरच जनता विश्वास ठेवते. प्रस्थापित व धनदांडग्या, लबाड लांडग्यांना जनता आता जवळ उभी राहू देणार नाही. कारण यांचा असली चेहरा नागरिकांना कळाला आहे.

बिहारच्या निवडणुकीने हे अगदी निर्विवादपणे सिद्ध करून दिले. प्रचंड पैसा, चमकदार प्रचारयंत्रणा, उच्चशिक्षित रणनीतिकारांची तुकडी, समाजमाध्यमांवरील मोहिमा, सर्वेक्षणांचे ढीग हे सर्व असूनही प्रशांत किशोर यांची रणनीती कोसळली. कारण एकही जमीनीवरचा कार्यकर्ता त्यांच्या बाजूने नव्हता! गावोगाव चालणाऱ्या शेकडो पायपीट, घाम गाळणारे प्रचार, कष्टांवर आधारलेली नाळही ताकद नसल्यास कोणताही पक्ष, कोणतीही रणनिती, कोणताही नेता टिकत नाही. कार्यकर्ता हेच राजकारणाचे हृदय आहे. नेतृत्व ज्या धोरणांचे आराखडे आखते त्यांना घराघरांत पोहोचवून लोकांचा विश्वास जिंकणारा कार्यकर्ताच असतो.

भाजपाचे बळ यातच आहे. विश्वासार्ह नेतृत्व आणि कार्यकर्त्यांचा महासागर. म्हणूनच विरोधक कितीही




'व्होटचोरी', 'EVM', 'पैशांचा वापर' अशा निराधार आरोपांची फेकाफेक करत राहो. या पक्षाची ताकद तळागाळातील रक्ताशी जोडलेली आहे. येथील नगरपरिषदेच्या निवडणुकीत हवा आहे. नवा, स्वच्छ आणि निर्भीड चेहरा!

परळी शहर एक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक संवर्धनाचे केंद्र होऊ शकते; पण त्यासाठी नगरपरिषद स्वच्छ, पारदर्शक आणि धाडसी नेतृत्वाच्या हातात असणे आवश्यक आहे. गेल्या अनेक वर्षांत नगरपरिषदेत कंत्राटदारांची सत्ता, व्यवहारांचा अपारदर्शकपणा, सत्ताधाऱ्यांचा स्वार्थ आणि जनतेच्या पैशाचे राजकीय हिशोब. ही चित्रे परळीकरांनी पुरे पाहिली. आज परिस्थिती अशी आहे की, कंत्राटदारी करणाऱ्या नेत्याची पत्नी नगराध्यक्षपदी बसवून लोकशाहीला 'कौटुंबिक कंत्राट' देण्याचा प्रकार पुन्हा करावयाचा प्रयत्न सुरू आहे. परळीची जनता आता इतकी भोळी नाही. नगरपरिषदेची सत्ता 'घरातील व्यक्तीस' देऊन खाजगी व्यावसायिक हितसंबंध साधणाऱ्या राजकारणाचा परळीकरांनी पुरता कंटाळा घेतला आहे. नगराध्यक्ष म्हणजे पद नाही जबाबदारी आहे! हे पद व्यवहारिक प्रामाणिकता, धोरणनिष्ठता आणि निर्भीड निर्णयक्षमता मागते. पण जेथे स्वतःच्या कंत्राटांना संरक्षण द्यायचे राजकारण असते, तेथे जनतेचा विश्वास तुडवला जातो, विकासाची गती ठप्प होते आणि नगरपरिषद 'कॅश काऊंटर' बनते. परळीला हवा आहे शुद्ध, पारदर्शक, विक्री न होणारा, दबावाखाली न येणारा चेहरा. जनतेची आज एकच मागणी आहे. नव्या नगरपरिषदेचे नेतृत्व कंत्राटदारीच्या सावलीतून मुक्त करा. आम्हाला स्वच्छ, पारदर्शक आणि जनतेला उत्तरदायी असा नगराध्यक्ष द्या! आज परळीतील मतदार नव्या पर्यायाकडे पाहू लागले आहेत. ज्या व्यक्तीला आपली वैयक्तिक, व्यावसायिक स्वार्थसाखळी नाही, ज्याच्याकडे जनतेशी जोडलेली बांधिलकी आहे, ज्याच्यात निर्भीड निर्णयक्षमता आहे, ज्याला कार्यकर्त्यांचे आणि सर्वसामान्यांचे दुःख समजते, ज्याचा पारदर्शक व्यवहार त्याची ओळख आहे.

**असा चेहरा नगराध्यक्षपदी हवा आहे :–** कारण, परळीचा आजचा प्रश्न फक्त राजकारणाचा नाही. हा प्रश्न आहे शहर कोणाकडे सोपवायचा? कंत्राटांच्या मालकाकडे? की शहराला खऱ्या अर्थाने सेवा देणाऱ्या लोकहितैषीकडे? विकास योजनांना वेग देण्यासाठी, परळीचे रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, बाजारपेठ नियोजन, पायाभूत सुविधा, आरोग्य व्यवस्था हे सर्व नव्याने उभे करण्याची गरज आहे.

हे काम 'घरचे कंत्राट टिकविणाऱ्या' नगराध्यक्षांकडून होणार नाही. ते करू शकतो तोच ज्याचे शहराशी व्यक्तिगत स्वार्थाऐवजी भावनिक नाते व सामाजिक बांधिलकी आहे. परळीकरांचा आवाज स्पष्ट आहे : आम्हाला नवा नेता द्या. स्वच्छ, पारदर्शक, आमच्यातला! या निवडणुकीचा निकाल एक संदेश देणार आहे. परळीमध्ये कुणाकडे पैसा आहे हे महत्वाचे नाही, कुणाकडे प्रामाणिकता आहे हे महत्वाचे आहे. आज शहराला हवा आहे...स्वच्छ प्रतिमेचा चेहरा., निर्भीड नेतृत्व, कार्यकर्त्यांवर प्रेम करणारा नेता, व्यवहारात पारदर्शकता राखणारा नगराध्यक्ष, परळीचा मतदार ठाम आहे, कंत्राटदारीचे राज्य आता संपले पाहिजे! आणि हीच वेळ आहे. शहराला नव्या दिशेने नेण्याची. त्यामुळे ज्यांना आजपर्यंत नगराध्यक्ष पदासाठी एकदा ही संधी मिळाली नाही. त्या सर्वसामान्य कुटुंबातील सक्षम व निर्भीड महिलेला नगराध्यक्ष पदाची संधी मिळावी.... एखाद्या कळसुत्री बाहुलीला नको. जी आपल्या पतिराजांच्या इशाऱ्यावर चेकवर सह्या करेल. जात-पात, धर्म, भाषा या संकुचित भावनेमधून बाहेर पडून परळी शहरातील अठरापगड जातीच्या लोकांनी शहराचा विकास साध्य करून घेण्यासाठी आता नवा आश्वासक चेहरा शोधायला हवा. बस्स झाले तेचतेच जुने चेहरे, तीच आश्वासने, त्याचं भुलाथापा, कोरडी आश्वासने. स्वार्थी व स्वतःचा आर्थिक विकास साध्य करणारे पोटार्थी नेते. शहराच्या विकासाच्या नावाखाली स्वतःचा आर्थिक विकास साध्य करून घेणाऱ्या. स्वार्थी व बेधुंद नेतृत्वाला खड्यासारखे बाजूला ठेवणार. परळी उठेल जर सक्षम व स्वतंत्र नेतृत्व उभे राहिले तर!

**– सौ.चित्रा देशपांडे,**
**परळी वैजनाथ**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

✲ वर्ष ०९ ✲ अंक २९ ✲ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ ✲ किंमत : २ रु.

# परळीला भय आणि भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला मतदान करा-हर्षवर्धन सपकाळ

परळी वैजनाथ, (बातमीदार):- काही विकृत लोकांमुळे आणि मागील दहा वर्षात सत्तेत असलेल्या सत्ताधाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे परळी सारखे ऐतिहासिक शहर बदनाम झाले होते .त्यामुळे परळीला भय आणि भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीलाच प्रचंड बहुमताने मतदान करा आणि परळी नगर परिषदेवर सर्वसामान्यांची सत्ता प्रस्थापित करा असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. परळी नगरपरिषद निवडणूक प्रचाराचा नारळ फोडल्यानंतर प्रचार सभेत ते बोलत होते. तर परळी ही काँग्रेसला माननारी आहे. समोर नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा सत्ताधाऱ्यांनीच पाठवलेला आहे .त्यांच्यावर विश्वास ठेवू नका असे माजी मंत्री अशोकराव पाटील यांनी सांगितले.

दिनांक २२ रोजी मोंढा मार्केट येथील भव्य प्रचार शुभारंभाच्या सभेतून परळी नगरपरिषद निवडणुकीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई तसेच नगरसेवक पदाचे दोन्ही पक्षांचे उमेदवार यांच्या प्रचाराचा शुभारंभ आज भव्य अशा सभेतून करण्यात आला. या सभेच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री अशोकराव पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेशभाऊ कांबळे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे , काँग्रेसचे राज्य सरचिटणीस आदित्य भैय्या पाटील, वंचितचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, जिल्हा सचिव एडवोकेट संजय रोडे,काँग्रेसचे प्रदेश कार्यकारणी सदस्य एडवोकेट अनिल मुंडे ,तालुकाध्यक्ष अडवोकेट प्रकाश मुंडे, ज्येष्ठ नेते वसंतराव मुंडे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष व उमेदवार गौतम साळवे, वंचित चे उमेदवार व प्रसिद्धीप्रमुख




बालासाहेब जगतकर, काँग्रेसचे उमेदवार बद्दर शेठ, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व उमेदवार विश्वनाथ गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सहा महिन्यापूर्वी बीड जिल्ह्यात काढण्यात आलेल्या सद्भावना पदयात्रेनंतर आज पुन्हा मी परळीत आलो आहे. परळीकर लाचार नाहीत तर स्वाभिमानी आहेत हे दाखवून द्या. ही लढाई मनुवादी आणि संविधान प्रेमी अशा मध्ये आहे .काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र आल्यामुळे त्यांनी वंचित चे आभार मानले. महाराष्ट्रात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाती-जाती आणि धर्मा - धर्मात भांडणे लावत आहेत .त्यांची नार्को टेस्ट करा असे जाहीर आवाहन करीत गुंडागर्दीला मुठमाती देण्यासाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी लाच मतदान करा अशी परळीकरांना विनंती केली.

यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना अशोकराव पाटील यांनी परळीकरांना नम्र आवाहन केले की पूर्वीची परंपरा स्थापन करण्यासाठी काँग्रेस वंचित आघाडीला मतदान करा. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर दोघेही संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी लढत आहेत .त्यांना आपण ताकद देण्याची गरज आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी परळीचा कायापालट करण्यासाठी, तर मिलिंद घाडगे यांनी गेल्या दहा वर्षापासून सत्तेत असणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आलेल्या निधीचा परळीकरांना हिशोब द्यावा, धनंजय मुंडे यांनी दिलेले एकही आश्वासन पाळले का याचे उत्तर द्यावे असे प्रतिपादन केले. तर संजय रोडे यांनी काँग्रेस, वंचित आघडीचा विजय निश्चित दिसत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी प्रास्ताविक केले. तर एडवोकेट अनिल मुंडे, तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे, विश्वनाथ गायकवाड वंचितचे जिल्हा सचिव एडवोकेट संजय रोडे, विश्वनाथ देवकर आदींनी आपले विचार मांडले. कार्यक्रमास परळी शहरातील काँग्रेस तसेच वंचित बहुजन आघाडीचे सर्व उमेदवार याबरोबरच आघाडीने पुरस्कार केलेले इतर उमेदवार, यांच्यासह कार्यकर्ते, पुरुष ,महिला मोठ्या संख्येने या प्रचार सभेला उपस्थित होते. ढोल ताशांच्या गजरात व काँग्रेस वंचित बहुजन आघाडीलाच विजयी करा या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. काँग्रेसच्या आजच्या या प्रचार शुभारंभाच्या सभेने वातावरण काँग्रेस व वंचितमय झाल्याचे दिसून येत होते. आजची ही प्रचार सभा म्हणजे २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीच्या विजयाची नांदी ठरल्याचे दिसून आले. ***

## परळीत मोकाट जनावरे, गाढवे आणि भटक्या कुत्र्यांचा परळी पालिकेने बंदोबस्त करावा - ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरात मोकाट जनावरे, गाढवे आणि भटक्या कुत्र्यांचा प्रचंड सुळसुळाट झाला असून शहरातील वाहतूक व्यवस्था तसेच नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. गर्दीच्या चौकांपासून निवासी भागांपर्यंत या मोकाट प्राण्यांची संख्या वाढल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण होत असून अपघाताचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. या गंभीर समस्येकडे नगरपरिषदेने तात्काळ लक्ष देऊन बंदोबस्त करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

मोंढा मार्केट, गणेशपार, शिवाजी चौक, टॉवर चौक या अत्यंत वर्दळीच्या भागांमध्ये रस्त्याच्या मध्यभागी मोकाट गायी, बैल, गुरे बसल्याचे वेळोवेळी दिसते. वाहनधारक कितीही हार्न वाजवला तरी जनावरे मार्ग सोडत नसल्याने वाहतुकीचा वेग खुंटतो आणि अचानक अपघात होण्याची शक्यता वाढते. अनेक वेळा वाहनचालकांना जनावरांना चुकवत जाण्याच्या प्रयत्नात मोठे अपघात घडल्याचे प्रकार समोर आले आहेत.




**मोंढा मार्केट परिसरात पुन्हा अतिक्रमणाचा विळखा:-** मोंढा मार्केट तसेच मार्केट कमिटी परिसरात गेल्या काही दिवसात पुन्हा अतिक्रमणे वाढू लागली आहेत. लहान व्यापाऱ्यांनी परवानगीशिवाय रस्त्यावर दुकाने मांडण्यास सुरुवात केली असून त्यामुळे वाहतुकीला अधिक अडथळा निर्माण होत आहे. मार्केट कमिटीने वेळेवर लक्ष न दिल्यास परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता असल्याचे ॲड. संकाये यांनी म्हटले आहे. नगरपरिषदेने मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा व्यवस्था प्रभावी करावी, तसेच गाढवे आणि इतर जनावरांना रस्त्यावरून तात्काळ हटवून शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवावी, अशीही मागणी त्यांनी केली.

**वल्लभनगरमध्ये भटक्या कुत्र्यांचा त्रास वाढला:-** दरम्यान, वल्लभनगर परिसरातील नागरिकांनी भटक्या कुत्र्यांचा त्रास भयावह पातळीवर गेल्याची तक्रार नोंदवली आहे. गेल्या चार पाच दिवसांपासून आक्रमक स्वरूपाचे भटके कुत्रे लोकांच्या अंगावर धावत आहेत, मुलांना चावण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्यामुळे परिसरातील कुटुंबे तीव्र दहशतीत जीवन जगत आहेत. नागरिकांनी वारंवार नगरपरिषदेच्या संबंधित कर्मचाऱ्यांना माहिती दिली असूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे हा परिसर मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या गल्लीजवळ असूनही ही परिस्थिती कायम आहे, हे अधिक चिंताजनक असल्याचे नागरिक म्हणतात. ***

## परळी नगर पालिकेच्या निवडणुकीत महायुतीच्या दोन जागा बिनविरोध

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी वैजनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये मंत्री पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे यांनी एकत्रित येत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलाही सोबत घेतले.





महायुती एकत्रितपणाने या निवडणुकीला सामोरे जात आहे. त्यामुळे मतदानाच्या प्रचाराला सुरुवात होण्यापूर्वीच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. परळीत महायुतीच्या दोन जागांवर प्रतिस्पर्ध्यांचे आव्हान संपुष्टात आले व एकमेव अर्ज शिल्लक राहिल्याने आजच निवडून आल्या आहेत.

राजकीयदृष्ट्या परळीची नगरपरिषद निवडणूक ही अतिशय प्रतिष्ठेची मानली जाते. या निवडणुकीत मोठे आव्हान देण्याची भूमिका शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने सुरुवातीपासून घेतली होती. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय व माजी नगराध्यक्ष राहिलेल्या दीपक देशमुख यांनाच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पक्षात घेऊन नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. ही निवडणूक अटीतटीची करण्याचा सुरुवातीपासून प्रयत्न केला होता. मात्र निवडणुकीचा अद्याप प्रचारही सुरू झाला नाही. त्याआगोदरच आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी महायुतीच्या दोन उमेदवारांचा विजय निश्चित झाला.दोन प्रभागांमध्ये महायुतीच्या उमेदवारांसमोर दाखल करण्यात आलेल्या उमेदवारांनी आपापले अर्ज मागे घेतल्याने या दोन जागांवर केवळ महायुतीचा एक - एकच उमेदवार राहिला असल्याने या जागा आजच निवडून आल्या आहेत. यामध्ये प्रभाग क्रमांक १३ अ मधील रेश्मा केशव बळवंत तर प्रभाग ११ब मधील जयश्री गीत्ते या महायुतीच्या दोन उमेदवारांचा विजय आजच निश्चित झाला. शिवसेनेत नुकताच पक्षप्रवेश केलेल्या जेष्ठनेते प्रा.टि.पी.मुंडे यांच्या जयश्री गित्ते या कन्या आहेत. त्यांच्यासमोर प्रतिस्पर्धी उमेदवाराच राहिला नसल्याने त्यांचा अनौपचारिक विजय आजच झाला आहे. त्याची औपचारिक घोषणा अधिकृतपणे निवडणूक विभाग लवकरच करेल. दरम्यान परळीच्या निवडणुकीत महायुतीला मिळालेले हे मोठे यश मानले जात आहे.तसेच हा शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे. ***

## मराठवाडा शिक्षक संघाची शिक्षणाधिकारी माध्यमिक समवेत तक्रार निवारण बैठक संपन्न

बीड (बातमीदार):- मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा प्रियाराणी पाटील यांच्या समवेत तक्रार निवारण बैठक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. अनेक प्रलंबित प्रश्न बैठकीतच सोडविण्यात आले तर काही प्रश्न ठराविक कालमर्यादेत सोडविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बाबत अधिक माहिती अशी की, शिक्षणाधिकारी माध्यमिक स्तरावरील आणि शालेय स्तरावरील प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मराठवाडा शिक्षक संघाने मा शिक्षणाधिकारी माध्यमिक समवेत तक्रार निवारण बैठक आयोजित करण्याची विनंती केली होती. त्यानुसार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, मार्गदर्शक डी.जी. तांदळे, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे, केंद्र कार्यकारिणी सदस्य अशोक मसकले, बंडू आघाव, विनोद सवासे यांनी संघटनेच्या वतीने भागिदारी केली तर मा प्रियाराणी पाटील, अजय बहीर, अधीक्षक(माध्यमिक), राजेश खटावकर अधिक्षक वेतन व भनिनि पथक, नानाभाऊ हजारे उपशिक्षणाधिकारी माध्यमिक,जेष्ठ लिपिक श्री तावडे शिक्षणाधिकारी माध्यमिकच्या वतीने बैठकीत भागिदारी केली. बारा व चोवीस वर्षाच्या अर्हताकारी सेवे नंतर देय्य प्रलंबित वरिष्ठ व निवड प्रकरणे निकाली काढण्या बाबत तातडीने कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या प्रलंबित फरकाचे हप्त्यां बाबत उचित कार्यवाही करणे, प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके तातडीने जमा करण्याचे आदेश निर्गमित करण्या बाबत निर्णय घेण्यात आले. निवड श्रेणी, वरिष्ठ श्रेणी, वैद्यकीय प्रतिपूर्त्ती देयकाका बाबतची अनेक वैयक्तिक प्रकरणे बैठकीतच निकाली काढण्यात आली. याप्रसंगी संघटनेच्या वतीने शिक्षण; प्रश्न अनेक-उत्तर एक ज्ञानोबा वरवड्डे गौरव ग्रंथ मान्यवरांना भेट देण्यात आला. ***



सा.परळी परिसर चे
वार्षिक वर्गणीदार व्हा!
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३